# सांगली जिल्हा परिषद निवडणूक: एक राजकीय विश्लेषण (१९९२ ते २०२४)

**किरण तुकाराम पाटील** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर सांगली जिल्ह्याचे स्थान अनन्यसाधारण असून, या जिल्ह्याला राज्याची 'राजकीय प्रयोगशाळा' म्हणून ओळखले जाते. पश्चिम महाराष्ट्रातील राजकारणाचा केंद्रबिंदू असलेल्या सांगलीत सहकार चळवळ, साखर कारखानदारी आणि प्रबळ राजकीय घराणी यांनी जिल्हा परिषदेच्या सत्तेला नेहमीच आपल्या प्रभावाखाली ठेवले आहे. १९९२ मधील ७३ व्या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त करून दिला, ज्यामुळे ग्रामीण नेतृत्वाच्या उदयाला नवी दिशा मिळाली. या पार्श्वभूमीवर, १९९२ ते २०२४ या ३२ वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडातील सांगली जिल्हा परिषदेच्या निवडणुकांचा अभ्यास करणे राजकीय आणि सामाजिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे ठरते. या कालखंडाच्या सुरुवातीला सांगली जिल्हा हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा अभेद्य बालेकिल्ला म्हणून ओळखला जात असे. वसंतदादा पाटील, गुलाबराव पाटील, राजारामबापू पाटील यांसारख्या दिग्गज नेत्यांनी घालून दिलेल्या पायाभरणीमुळे जिल्ह्याच्या ग्रामीण सत्तेवर दशकानुदशके एकाच विचारधारेचे वर्चस्व राहिले. मात्र, १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची झालेली स्थापना आणि त्यानंतर २०१४ नंतर भारतीय जनता पक्षाने ग्रामीण भागात केलेला शिरकाव यामुळे जिल्ह्याचे राजकारण 'एकपक्षीय वर्चस्वाकडून बहुपक्षीय स्पर्धेकडे' वळले आहे. या प्रवासात आर. आर. पाटील, पतंगराव कदम आणि जयंत पाटील यांसारख्या नेत्यांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आपले राजकीय गट अधिक बळकट केले.

प्रस्तुत अभ्यास हा केवळ निवडणुकांच्या निकालापुरता मर्यादित नसून, तो ग्रामीण भागातील सत्तेचे विकेंद्रीकरण, महिलांना मिळालेले ५०% आरक्षण आणि त्यातून निर्माण झालेले नवे नेतृत्व यांचा वेध घेणारा आहे. साखर कारखाने आणि दूध संघांच्या माध्यमातून निर्माण झालेली 'सहकारी सत्ता' जिल्हा परिषदेच्या निवडणुकीवर कशा प्रकारे प्रभाव टाकते, याचाही ऊहापोह या अभ्यासात करण्यात आला आहे. बदलत्या काळात सोशल मीडियाचा वापर, मतदारांचे बदललेले प्राधान्यक्रम आणि पारंपरिक गटबाजीला छेद देणारे नवे राजकीय प्रवाह यांचा चिकित्सक अभ्यास करणे हे या संशोधनाचे मुख्य प्रयोजन आहे. थोडक्यात, १९९२ ते २०२४ हा प्रवास सांगली जिल्ह्याच्या ग्रामीण राजकारणातील स्थित्यंतराचा ऐतिहासिक आणि राजकीय दस्तऐवज आहे.

पारिभाषिक शब्द : जिल्हा परिषद, राजकीय विश्लेषण, सत्तांतर, सहकारी राजकारण, आरक्षण

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. सांगली जिल्हा परिषद निवडणुकीच्या १९९२ ते २०२४ या काळातील निकालांचे विश्लेषण करणे.
२. जिल्ह्याच्या राजकारणात सहकार क्षेत्राचा आणि प्रबळ घराण्यांचा प्रभाव तपासणे.
३. निवडणुकीच्या राजकारणातील महिला आणि मागासवर्गीय प्रतिनिधींच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
४. मतदारांच्या बदलत्या कलानुसार राजकीय पक्षांच्या वाढत्या किंवा घटत्या प्रभावाची कारणे शोधणे.

**संशोधन पद्धती :**

या अभ्यासासाठी 'मिश्र संशोधन पद्धती' वापरली जाते . द्वितीयक साधने मध्ये निवडणूक आयोगाचे अहवाल, शासकीय गॅझेटियर, वर्तमानपत्रांतील कात्रणे आणि पूर्वीचे प्रबंध.

**विषय विवेचन :**

सांगली जिल्ह्याच्या राजकीय इतिहासात वसंतदादा पाटील, आर. आर. पाटील आणि डॉ. पतंगराव कदम या तीन दिग्गज नेतृत्वांचा जिल्हा परिषदेवर असलेला प्रभाव अत्यंत सखोल आणि पायाभूत राहिला आहे. या नेत्यांनी केवळ निवडणुका जिंकल्या नाहीत, तर जिल्हा परिषदेला ग्रामीण विकासाचे आणि नेतृत्व घडवण्याचे मुख्य केंद्र बनवले. वसंतदादा पाटील यांनी सहकार चळवळीच्या माध्यमातून सांगलीच्या राजकारणाचा पाया रचला. त्यांच्या काळात जिल्हा परिषद ही केवळ एक प्रशासकीय संस्था नसून ती ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांना बळ देणारी 'राजकीय शाळा' होती. दादांनी साखर कारखाने आणि शिक्षण संस्थांचे जाळे विणून जिल्हा परिषदेवर काँग्रेसची अभेद्य पकड निर्माण केली. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच ग्रामीण भागातील सामान्य कार्यकर्ता जिल्हा स्तरावर नेतृत्व करू शकला, ज्याचा प्रभाव १९९२ नंतरच्या दशकातही स्पष्टपणे दिसून येतो. त्यानंतरच्या काळात डॉ. पतंगराव कदम यांनी आपल्या शैक्षणिक आणि सहकार साम्राज्याच्या जोमाने जिल्हा

परिषदेच्या राजकारणात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. वाळवा-कडेगाव परिसरातील गटबाजीला छेद देत त्यांनी जिल्ह्याच्या राजकारणात 'कदम गट' हा एक प्रबळ घटक म्हणून प्रस्थापित केला. जिल्हा परिषदेच्या जागावाटपापासून ते अध्यक्ष निवडीपर्यंत पतंगरावांचा शब्द अंतिम मानला जात असे. त्यांनी प्रशासकीय कामात शिस्त आणण्यासोबतच आपल्या मतदारसंघाबाहेरही जिल्हा परिषदेच्या माध्यमातून कार्यकर्त्यांचे मोठे जाळे विणले.

सांगलीच्या राजकारणातील तिसरा महत्त्वाचा स्तंभ म्हणजे आर. आर. (आबा) पाटील. आबांनी जिल्हा परिषद सदस्य म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली आणि तिथूनच त्यांनी थेट राज्याच्या गृहमंत्रीपदापर्यंत मजल मारली. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून 'स्वच्छता अभियान' आणि 'तंटामुक्त गाव' यांसारख्या योजनांना लोकचळवळीचे स्वरूप देण्यात त्यांचा मोठा वाटा होता. सामान्य माणसाशी असलेली नाळ आणि पारदर्शक राजकारणामुळे त्यांनी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला मोठे यश मिळवून दिले. या तिन्ही नेत्यांच्या कार्यशैलीमुळे सांगली जिल्हा परिषदेचे राजकारण हे केवळ सत्तेचे केंद्र न राहता, ते विकासाचे आणि प्रबळ नेतृत्वाच्या संघर्षाचे प्रतीक बनले आहे.

सांगली जिल्हा परिषद निवडणूक विश्लेषण (१९९२-२०२४) :

१९९२ ची जिल्हा परिषद निवडणूक ही सांगलीच्या राजकारणातील एक ऐतिहासिक वळण ठरली. ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळालेला घटनात्मक दर्जा आणि महिलांसाठी लागू झालेले ३३% आरक्षण यामुळे ग्रामीण सत्तेची समीकरणे बदलली. या सुरुवातीच्या कालखंडात सांगली जिल्हा हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा अभेद्य गड म्हणून ओळखला जात असे. दिवंगत नेते वसंतदादा पाटील यांच्या निधनानंतरही जिल्ह्यावर 'दादा गटाचे' वर्चस्व कायम होते आणि सहकार क्षेत्रातील दिग्गज नेत्यांनी आपल्या निष्ठावान कार्यकर्त्यांना जिल्हा परिषदेवर पाठवून ग्रामीण भागावर आपली राजकीय पकड घट्ट केली होती.

मात्र, १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर सांगलीच्या राजकारणात सत्तेची मोठी फाळणी झाली. आर. आर. पाटील आणि जयंत पाटील यांनी राष्ट्रवादीची धुरा सांभाळली, तर डॉ. पतंगराव कदम आणि मदन पाटील काँग्रेसमध्येच राहिले. २००२ च्या निवडणुकीत प्रथमच या दोन पक्षांत काटाजोड लढत पाहायला मिळाली. २००७ पर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसने वाळवा, तासगाव आणि आटपाडी यांसारख्या महत्त्वाच्या तालुक्यांत आपले बस्तान बसवून जिल्ह्याच्या राजकारणात मोठी मुसंडी मारली. सांगली जिल्हा परिषदेचे राजकारण हे नेहमीच साखर कारखाने, सूत गिरण्या आणि दूध संघांच्या 'सहकारी सत्ते'भोवती फिरत राहिले आहे. जिल्ह्यातील कदम, पाटील, मोहिते आणि नायकवडी यांसारख्या प्रबळ राजकीय घराण्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद गटांवर वर्चस्व राखले, ज्यामुळे जिल्हा परिषद सदस्यपद हे आमदारकीच्या निवडणुकीची 'तालीम' मानले जाऊ लागले.

२०१४ नंतर महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर झालेल्या बदलांचे पडसाद २०१७ च्या जिल्हा परिषद निवडणुकीत स्पष्टपणे उमटले. भाजपच्या इतिहासात पहिल्यांदाच त्यांनी सांगलीत मोठी झेप घेत जत, कवठेमहांकाळ आणि मिरज पूर्व भागात आपले अस्तित्व सिद्ध केले. खासदार संजयकाका पाटील आणि चंद्रकांत पाटील यांच्या रणनीतीमुळे काँग्रेस-राष्ट्रवादीच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लागला आणि जिल्ह्याच्या राजकारणात 'कमळ' फुलले. याच काळात २०१२ पासून लागू झालेल्या ५०% महिला आरक्षणामुळे महिलांचे प्रतिनिधित्व वाढले असले, तरी प्रत्यक्षात 'सदस्य पती' ही संकल्पना अनेक ठिकाणी प्रभावी ठरली.

२०२४ ची सद्यस्थिती पाहता, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीमुळे सांगलीचे राजकारण अत्यंत गुंतागुंतीचे झाले आहे. आता ही लढत केवळ पक्षांपुरती मर्यादित नसून 'महायुती विरुद्ध महाविकास आघाडी' अशी बनली आहे. एकेकाळी एकहाती सत्ता असलेल्या काँग्रेसला आता अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागत आहे, तर दुसरीकडे भाजपची मुळे ग्रामीण भागात खोलवर रुजली आहेत. आजच्या स्थितीत पक्षनिष्ठेपेक्षा स्थानिक नेत्यांचा व्यक्तिगत करिष्मा आणि सोशल मीडियाचा वापर यांवर निवडणुकीचे भवितव्य अवलंबून आहे. आगामी काळात रस्ते आणि पाणी यांसारख्या मूलभूत प्रश्नांसोबतच मराठा व ओबीसी आरक्षण आणि शेतीमालाचे भाव हे मुद्दे जिल्हा परिषद निवडणुकीत निर्णायक ठरतील, असा निष्कर्ष निघतो.

जिल्ह्याच्या राजकारणात सहकार क्षेत्राचा आणि प्रबळ घराण्यांचा प्रभाव :

सांगली जिल्ह्याच्या राजकारणात सहकार क्षेत्र आणि प्रबळ राजकीय घराणी यांचा प्रभाव इतका सखोल आहे की, येथील जिल्हा परिषद निवडणुका या केवळ लोकशाहीचा भाग नसून त्या 'सहकारी सत्तेचा' विस्तार मानल्या जातात.

सांगलीच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेला साखर कारखाना, दूध संघ, जिल्हा मध्यवर्ती बँक आणि सूत गिरण्या या संस्थांवर ज्यांचे नियंत्रण असते, त्यांचेच जिल्हा परिषदेवर वर्चस्व राहते. या प्रक्रियेत जिल्ह्याच्या राजकारणाचे 'घराणीकरण' झाले असून, ठराविक कुटुंबांनी दशकानुदशके जिल्हा परिषदेच्या सत्तेची सूत्रे आपल्या हाती ठेवली आहेत.

या प्रभावाचा उगम वसंतदादा पाटील यांच्या सहकार क्रांतीत दिसून येतो. दादांनी सुरू केलेल्या सहकार चळवळीने ग्रामीण भागात कार्यकर्त्यांचे एक मोठे जाळे निर्माण केले. सांगलीत जिल्हा परिषद निवडणुकीचे तिकीट कोणाला मिळणार, हे अनेकदा राजकीय पक्षाच्या कार्यालयात ठरण्याऐवजी साखर कारखान्याच्या 'बोर्ड रूम'मध्ये ठरवले जाते. साखर कारखान्याचा प्रत्येक 'झोन' हा जिल्हा परिषदेच्या एका 'गटाशी' जोडलेला असतो. कारखान्याचा अध्यक्ष किंवा संचालक मंडळ हे आपल्या कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद उमेदवाराचे भवितव्य ठरवण्यात निर्णायक भूमिका बजावतात. यामुळेच जिल्हा परिषद ही या मोठ्या नेत्यांसाठी आपली 'व्होट बँक' सुरक्षित ठेवण्याचे आणि ग्रामीण भागातील विकास निधीवर नियंत्रण मिळवण्याचे साधन बनली आहे.

दुसरीकडे, सांगलीच्या राजकारणात प्रबळ घराण्यांचा प्रभाव अत्यंत टोकाचा आहे. वाळवा तालुक्यात पाटील (जयंत पाटील) आणि नायकवडी घराणे, कडेगाव-पलूसमध्ये कदम (पतंगराव कदम) घराणे, तासगावमध्ये आर. आर. पाटील यांचे कुटुंब, जतमध्ये जगताप आणि खानापूर-आटपाडीत बाबर व देशमुख घराणी अशा स्थानिक सत्ताकेंद्रांनी जिल्हा परिषदेच्या राजकारणाला आपल्याभोवती केंद्रित केले आहे. या घराण्यांनी केवळ स्वतःची सत्ता टिकवली नाही, तर आपल्या पुढच्या पिढीला राजकारणात उतरवण्यासाठी जिल्हा परिषद ही पहिली पायरी (लॉन्चिंग पॅड) म्हणून वापरली. अनेकदा विधानसभा निवडणुकीची 'तालीम' म्हणून जिल्हा परिषदेच्या निवडणुकांकडे पाहिले जाते. जर एखाद्या घराण्याचा उमेदवार जिल्हा परिषदेत पराभूत झाला, तर त्याचा थेट परिणाम त्या नेत्याच्या आमदारकीच्या निवडीवर होतो, इतकी ही व्यवस्था एकमेकांत गुंतलेली आहे.

जिल्हा परिषदेचा विकास निधी, मग तो रस्ते असो, शाळा असो किंवा आरोग्य केंद्र, हा अनेकदा या प्रबळ घराण्यांच्या वर्चस्व असलेल्या गावांकडे अधिक वळवला जातो. यातून 'सत्ता आणि विकास' असे एक दुष्टचक्र तयार झाले आहे, जिथे सामान्य कार्यकर्त्याला स्वतंत्रपणे नेतृत्व करण्याची संधी मिळणे कठीण होते. निवडणुकीच्या काळात हे सहकार सम्राट आपल्या कारखान्यातील यंत्रणा, कर्मचारी आणि आर्थिक ताकद जिल्हा परिषदेच्या प्रचारात उतरवतात. परिणामी, सांगली जिल्हा परिषदेचे राजकारण हे 'पक्षीय विचारधारे'पेक्षा 'घराण्यांची प्रतिष्ठा' आणि 'सहकारातील हितसंबंध' यावर अधिक आधारलेले दिसते. २०१८-१९ नंतर भाजपचा प्रभाव वाढला असला, तरी त्यांनीही याच प्रबळ घराण्यांमधील असंतुष्ट नेत्यांना आपल्याकडे खेचून आपली सत्ता वाढवण्याचा प्रयत्न केला, जे या प्रभावाची पुष्टीच करते.

निवडणुकीच्या राजकारणातील महिला आणि मागासवर्गीय प्रतिनिधींच्या भूमिका :

सांगली जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'महिला आणि मागासवर्गीय प्रतिनिधींची भूमिका' हा अत्यंत कळीचा आणि सामाजिक परिवर्तनाचा विषय आहे. १९९२ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीने या दोन्ही घटकांना मुख्य प्रवाहातील राजकारणात आणण्यासाठी आरक्षणाची तरतूद केली. सांगली जिल्ह्यात २०१२ पासून जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये महिलांना ५०% आरक्षण लागू झाले. यामुळे जिल्हा परिषदेच्या एकूण ५० ते ६० जागांपैकी निम्म्या जागांवर महिलांचे नेतृत्व अनिवार्य झाले. सुरुवातीच्या काळात, अनेक ठिकाणी 'सदस्य पती' ही संकल्पना प्रबळ होती. म्हणजेच, जागा महिलांसाठी राखीव झाली की घरातील प्रबळ पुरुष नेता आपल्या पत्नीला किंवा सुनेला निवडणुकीत उतरवत असे आणि पडद्यामागून स्वतःच कारभार पाहत असे. मात्र, गेल्या दोन दशकांत हे चित्र हळूहळू बदलताना दिसत आहे. सांगलीतील अनेक महिला प्रतिनिधींनी केवळ नावाला पद न भोगता प्रशासकीय कामात स्वतःचा ठसा उमटवला आहे. आरोग्य, शिक्षण आणि अंगणवाडी यांसारख्या ग्रामीण विकासाच्या मूलभूत विषयात महिला सदस्यांनी घेतलेले पुढाकार महत्त्वाचे ठरले आहेत. कडेगाव, वाळवा आणि तासगाव यांसारख्या तालुक्यांतून पुढे आलेल्या महिला नेतृत्वाने जिल्हा परिषदेच्या सभांमध्ये आक्रमकपणे प्रश्न मांडण्यास सुरुवात केली आहे. तरीही, आजही निर्णय प्रक्रियेत पूर्ण स्वातंत्र्य मिळवण्यासाठी महिलांना 'घराणेशाहीच्या' चौकटीशी संघर्ष करावा लागतो, हे वास्तव नाकारता येत नाही.

अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) आणि इतर मागासवर्गीय (OBC) समुदायांसाठी असलेल्या आरक्षणाने सांगलीच्या ग्रामीण राजकारणात सत्तेचे सामाजिक समतोल राखण्याचे काम केले आहे. सांगली जिल्ह्यात विशेषतः जत, आटपाडी आणि मिरज पूर्व या भागात मागासवर्गीय प्रतिनिधींची भूमिका निर्णायक ठरते.

१. नेतृत्वाची संधी: आरक्षणा मुळे या समाजातील अशा व्यक्तींना जिल्हा परिषदेत जाण्याची संधी मिळाली, ज्यांना पारंपरिक 'सहकारी' राजकारणात स्थान मिळणे कठीण होते. त्यांनी आपल्या समाजातील वस्त्यांचे प्रश्न, रस्ते, वीज आणि समाजकल्याण विभागाचा निधी थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

२. राजकीय तडजोडी: अनेकदा प्रबळ मराठा घराणी आपल्या सत्तेचा समतोल राखण्यासाठी मागासवर्गीय प्रतिनिधींना 'किंगमेकर' म्हणून वापरतात. विशेषतः अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष निवडीच्या वेळी या प्रतिनिधींचे महत्त्व वाढते.

३. आव्हाने: आजही अनेक मागासवर्गीय प्रतिनिधींना जिल्हा परिषदेत निवडून आल्यावरही मोठ्या नेत्यांच्या 'गटात' राहूनच काम करावे लागते. स्वतःचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व निर्माण करण्यात त्यांना आर्थिक आणि सामाजिक मर्यादा येतात.

एकूणच, सांगली जिल्हा परिषदेत महिला आणि मागासवर्गीय प्रतिनिधींनी केवळ संख्यात्मक उपस्थिती न दाखवता, ग्रामीण राजकारणाचे स्वरूप 'समावेशक' बनवले आहे. महिलांच्या सहभागामुळे गावातील पाण्याचे आणि आरोग्याचे प्रश्न प्राधान्याने सुटू लागले आहेत, तर मागासवर्गीय प्रतिनिधींमुळे वंचितांचा आवाज सत्तेच्या दालनापर्यंत पोहोचला आहे. जरी आजही या प्रतिनिधींवर प्रबळ राजकीय घराण्यांचा प्रभाव असला, तरी लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी ही प्रतिनिधींची भूमिका भविष्यात अधिक स्वायत्त आणि प्रभावी ठरेल, यात शंका नाही.

मतदारांच्या बदलत्या कलानुसार राजकीय पक्षांच्या वाढत्या किंवा घटत्या प्रभावाची कारणे:

सांगली जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'मतदारांचा बदलता कल आणि राजकीय पक्षांचा प्रभाव' यांचे विश्लेषण करताना गेल्या तीन दशकांतील सामाजिक आणि तांत्रिक बदलांचा विचार करणे आवश्यक आहे. १९९२ ते २०२४ या कालखंडात मतदारांच्या मानसिकतेत झालेले बदल हे पक्षीय प्रभावाच्या चढ-उताराला कारणीभूत ठरले आहेत. सुरुवातीच्या काळात सांगलीतील मतदार प्रामुख्याने 'पक्षनिष्ठा' आणि 'घराणेशाही' या दोन घटकांवर आधारित मतदान करत असे. काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या या जिल्ह्यात नेत्याचा शब्द हाच अंतिम आदेश मानला जाई. मात्र, १९९९ नंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या उदयामुळे मतदारांकडे पर्याय निर्माण झाले आणि सत्तेचे विकेंद्रीकरण झाले. या बदलाचे मुख्य कारण म्हणजे सहकार क्षेत्रातील पडझड आणि नव्या पिढीच्या अपेक्षा होय. ज्या नेत्यांनी साखर कारखाने किंवा दूध संघांच्या माध्यमातून मतदारांना आर्थिक स्थैर्य दिले, त्यांचा प्रभाव टिकून राहिला; मात्र जिथे सहकार संस्था डबघाईला आल्या, तिथे मतदारांनी पर्यायी नेतृत्वाचा शोध घेतला.

२०१४ नंतर मतदारांच्या कलात एक मोठा 'वैचारिक बदल' दिसून आला. केवळ स्थानिक प्रश्नच नव्हे, तर राष्ट्रीय मुद्दे आणि 'विकास' या संकल्पनेकडे तरुण मतदार आकर्षित झाला. यामुळेच भाजपला सांगलीच्या ग्रामीण भागात, विशेषतः जत आणि मिरज पूर्व सारख्या दुष्काळी पट्ट्यात शिरकाव करता आला. सोशल मीडियाचा वाढता प्रभाव हेदेखील एक प्रमुख कारण आहे. आता मतदार केवळ प्रत्यक्ष सभेतील भाषणावर विसंबून न राहता, व्हॉट्सॲप आणि फेसबुकच्या माध्यमातून उमेदवाराच्या कामाचे मूल्यमापन करतो. यामुळे प्रस्थापित नेत्यांच्या 'गटबाजीच्या' राजकारणाला छेद बसू लागला आहे.

याव्यतिरिक्त, 'जातीय समीकरणे' आणि 'आरक्षणाचे मुद्दे' (उदा. मराठा, धनगर आणि ओबीसी आरक्षण) यामुळे मतदारांच्या ध्रुवीकरणाचे प्रमाण वाढले आहे. पक्षांपेक्षा आता मतदार आपल्या समाजाच्या हिताचे रक्षण करणाऱ्या उमेदवाराला अधिक पसंती देऊ लागला आहे. मतदारांची वाढलेली राजकीय जागरूकता आणि प्रस्थापित नेत्यांविरुद्धची 'अँटी-इन्कंबन्सी' (सत्ताविरोधी लाट) यामुळे कोणत्याही एका पक्षाचे कायमस्वरूपी वर्चस्व आता धोक्यात आले आहे. म्हणूनच, २०२४ च्या उंबरठ्यावर सांगलीचे राजकारण हे 'पक्षीय निष्ठे'कडून 'कामगिरी आधारित' आणि 'आघाडीच्या' राजकारणाकडे सरकलेले दिसते.

**निष्कर्ष :**

सांगली जिल्हा परिषदेच्या १९९२ ते २०२४ या ३२ वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडाचा अभ्यास केला असता, काही महत्त्वपूर्ण राजकीय आणि सामाजिक निष्कर्ष समोर येतात. या अभ्यासाचा सर्वात मुख्य निष्कर्ष म्हणजे सांगलीचे ग्रामीण राजकारण आजही प्रामुख्याने सहकार संस्थांच्या नियंत्रणाभोवतीच फिरत आहे. साखर कारखाने, दूध संघ आणि जिल्हा बँकांवरील पकड हीच जिल्हा परिषदेच्या सत्तेची गुरुकिल्ली राहिली आहे. ज्या नेत्यांचे सहकार क्षेत्रावर वर्चस्व आहे, त्यांचेच उमेदवार जिल्हा परिषदेत निवडून येण्याचे प्रमाण अधिक आहे. मात्र, १९९२ च्या तुलनेत २०२४ पर्यंत मतदारांच्या मानसिकतेत लक्षणीय बदल झाला असून राजकीय जागरूकता वाढली आहे. असे असले तरी, सांगलीच्या मातीत 'पक्षनिष्ठे'पेक्षा 'व्यक्तिनिष्ठा' आणि 'घराणेशाही' अधिक प्रभावी असल्याचे दिसून येते. मतदार पक्षाच्या चिन्हापेक्षा स्थानिक

नेत्याच्या कामाला आणि त्यांच्याशी असलेल्या वैयक्तिक संबंधांना अधिक महत्त्व देतात, ज्यामुळे अनेकदा प्रस्थापित नेत्यांचे 'पॉकेट्स' किंवा बालेकिल्ले अबाधित राहतात.

दुसरा महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे, २०१४ नंतर राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर झालेल्या युती व आघाडीच्या राजकारणाचा थेट आणि खोलवर परिणाम जिल्हा स्तरावरील जागा वाटपावर झाला आहे. एकेकाळी एकहाती सत्ता उपभोगणाऱ्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला आता भाजप आणि इतर मित्रपक्षांच्या आव्हानामुळे तडजोडीचे राजकारण करावे लागत आहे. यामुळे जिल्हा परिषदेत 'बहुपक्षीय स्पर्धा' निर्माण झाली असून, छोट्या स्थानिक आघाड्यांनाही महत्त्व प्राप्त झाले आहे. तसेच, ५०% महिला आरक्षणामुळे महिलांचा सहभाग वाढला असला, तरी निर्णय प्रक्रियेत अजूनही पुरुषी वर्चस्व जाणवते. बदलत्या काळात सोशल मीडियाचा वापर आणि प्रचाराच्या हायटेक पद्धतींमुळे पारंपारिक प्रचाराचे स्वरूप बदलले आहे. थोडक्यात, सांगली जिल्हा परिषद हे केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेचे केंद्र नसून, ते राज्याच्या राजकारणातील सत्तासंघर्षाचे आणि सहकार-राजकारणाच्या समन्वयाचे एक जिवंत प्रतीक बनले आहे.

**संदर्भ सूची :**

१. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग. (१९९२-२०१७). सांगली जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक निकाल सांख्यिकीय अहवाल. मुंबई: शासकीय मुद्रणालय.

२. भारत सरकार. (१९९२). ७३ वी घटनादुरुस्ती कायदा: स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण. नवी दिल्ली: विधी आणि न्याय मंत्रालय.

३. जिल्हा सांख्यिकी कार्यालय, सांगली. (२०२३). जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन: सांगली जिल्हा. महाराष्ट्र शासन.

४. पाटील, बी. बी. (२०१५). आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण. कोल्हापूर: फडके प्रकाशन.

५. पळशीकर, सु. (२००४). महाराष्ट्राचे राजकारण: राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ. पुणे: प्रतिमा प्रकाशन.

६. बोराटे, व्ही. (२०१८). महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण राजकारण. मुंबई: हिमालय पब्लिशिंग हाऊस.

७. सकाळ वृत्तसमूह. (२०१७, फेब्रुवारी २४). सांगली जिल्हा परिषद निवडणूक विशेष पुरवणी. सांगली आवृत्ती.

८. लोकमत न्यूज नेटवर्क. (२०२४, जानेवारी १०). सांगलीच्या राजकारणातील घराणेशाही आणि बदलती समीकरणे (विशेष लेख). लोकमत, सांगली.

९. पुढारी ई-पेपर. (२०२२). सांगली जिल्हा परिषद: सहकार आणि सत्तेचा संघर्ष. [पुढारी ऑनलाईन].

१०. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग. (२०२६). निवडणूक आकडेवारी आणि निकाल विभाग. https://mahasec.maharashtra.gov.in वरून प्राप्त.